# श्रीमती इंदिरा गांधीचा 20 सुत्री कार्यक्रम

**प्रा.नितेश आर.रामटेके**
**सहाय्यक प्राध्यापक**
**श्री गोविंदप्रभू कला व वाणिज्य महाविद्यालय,**
**तळोधी (बाळापूर), जि.चंद्रपूर**

## ✱ प्रस्तावणा –

लोकशाही राज्यव्यवस्था जगातील इतर राज्यव्यवस्थेच्या तुलणेत समाजाची तसेच सर्व व्यक्तिंच्या योग्यतांचा विकास करण्यामध्ये अधिक सहाय्यक असते. समाजातील प्रगतीच्या शक्यता जोपर्यंत सर्व व्यक्तिंना आपल्या योग्यतांचा विकास करण्याची सारखी संधी मिळणार नाही, तोपर्यंत आपल्या अत्युच्च विकासाला मिळू शकत नाही. असा समान विकास झाला तर सर्व व्यक्तिंच्या क्षमतांचा फायदा उचलून समाज प्रगतीच्या शिखरावर नेता येवू शकतो. मानवी स्वभावाच्या योग्यतांमध्ये अधिकाधीक विश्वास ठेवणे, तसेच प्रत्येकाला विकासाची संधी देणे हाच लोकशाहीचा आधार होय. श्रीमती इंदिरा गांधी या अशा नेत्या होत्या ज्यांनी नेहमी भारतीय जनतेच्या विकासाच्या क्षमतेवर विश्वास ठेवला. तसेच संसदीय लोकशाहीच्या अंतर्गत संपुर्ण भारतीय समाजाचा विकास घडवून आणण्याकरीता 20 सुत्री कार्यक्रमाची अमलबजावणी केली. भारतीय लोकशाहीच्या दृढ विश्वासाला व्यक्त करण्याचे काम या कार्यक्रमाने केले. इंदिरा सरकारचा उद्‌देश भारतीय जनतेच्या विकासात सहाय्यक बनने हा होता. जर जनतेने 20 सुत्री कार्यक्रमाविषयी आपली निष्ठा आणि विश्वास व्यक्त केला होता तो केवळ याकरीता नाही. की तो कार्यक्रम सरकार कडून दिला गेला होता. तर तो यासाठी की हा कार्यक्रम नागरीकांना चांगले जीवन तथा त्यांचे कल्याण आणि सामाजीक व नैतीक विकास करण्यामध्ये सहाय्यक होता. या 20 सुत्री कार्यक्रमामध्ये समाजातील भिन्न–भिन्न संघटनांमध्ये समन्वय स्थापीत करण्यात आला होता. देशांतर्गत भिषण आर्थीक मंदी असतांनाही या कार्यक्रमाव्दारे एका नव्या आर्थीक धोरणांची निर्मीती केली. या कार्यक्रमाने करोडो भारतीयांच्या जिवनाला उत्साहीत केले. तसेच त्यांच्या कल्पनेतील भावनांना सृजनशीलतेकडे वळविले. जगाच्या इतिहासातील 20 व्या शतकातील हा मोठा आर्थीक कार्यक्रम होता. या सामाजिक कार्यक्रमांव्दारे विवेकहीन आणि प्रतिक्रियावादी तत्वांपासुन उत्पन्न होणाऱ्या नव्या विनाशक आदर्शांना जन्म घेण्यापासुन रोखण्यात आले. हा आर्थीक कार्यक्रम एकप्रकारचे अहिंसक आंदोलन होते. ज्याद्वारे भारतीय जनतेला त्यांचे मुळ अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. राष्ट्रीय संपत्तीच्या न्यायपुर्ण वितरणाला स्थापीत करणे हा एक महत्वपूर्ण उद्‌देशसुध्दा त्यामागे होता.

## ✱ 20 सुत्री कार्यक्रम :—

20 सुत्री कार्यक्रमाच्या घोषणेने देशातील करोडो लोकांमध्ये आशेचे नवे किरण निर्माण झाले. या कार्यक्रमांचे ध्येय आर्थीक विकासासोबतच सामाजीक विकास साध्य करणे देखील होते. हा कार्यक्रम पुढीलप्रमाणे :—

1) आवश्यक वस्तुंच्या किंमती खाली आणणे, आवश्यक वस्तु मिळवीणे आणी त्यांचे वितरण करणे याकरिता नियम बनविणे व सरकारी खर्चात कपात करणे.

2) ग्रामीण क्षेत्रात जमीनीचे सिलींग अमलात आणणे आणि अधिकची जमीन भुमीहीनांमध्ये वाटून देणे.

3) ग्रामीण क्षेत्रात दुर्बल लोक समुहामध्ये घरे बांधण्याकरीता जमीनी वाटणे.

4) वेठबिगारीची पध्दत कायदेशीररीत्या नष्ठ करणे.

5) ग्रामीण क्षेत्रातील कर्जबाजारीपणा नष्ट करणे.

6) ग्रामीण क्षेत्रात कमीत—कमी मजुरी कितपत देता येईल याकरीता कायद्याचे समीक्षण करणे.

7) शेतीकरीता जास्त पाणी पुरविणे आणि याकरीता मोठया प्रमाणावर कार्यक्रम हाती घेणे.

8) केंद्रीय नियंत्रणाखाली जास्तीत जास्त सुपर थर्मल पॉवर स्टेशन्स आणणे.

9) खादीचे उत्पादन वाढविणे, हॅडलूम क्षेत्रात विकासाचा नविन कार्यक्रम आणणे.

10) लोकं वापरत असलेल्या कपडयांमध्ये सुधारणा घडवून आणणे व त्या कपडयांचे उत्पादन वाढविणे.

11) शहरी जमीनीचे सामाजिकरीण घडवून आणणे. शहरात प्रत्येकाने किती जमीन बाळगावी यावर सिलींग आणणे.

12) कर बुडवेपणाची प्रवृत्ती वाढणार नाही याकरीता उपाययोजना करणे.

13) तस्करांच्या संपत्तीची जप्ती करणे व त्याकरीता विशेष कायद्यांची तरतुद करणे.

14) आयात लायसेन्सचा दुरूपयोग होणार नाही याकरीता विशेष कायदा करणे.

15) मजूरांचा उद्योगधंद्यांशी जास्त संबंध येईल यादृष्टीने योजना आखणे.

16) रस्त्यांचे दळणवळण वाढविणे. त्याकरीता राष्ट्रिय परमीट योजना अंमलात आणणे.

17) आयकरात सवलती देणे याकरीता सवलतीची मर्यादा वाढवून 8000 रूपये ठरविण्यात आली.

18) विद्यार्थ्यांना स्वस्त दरात आवश्यक वस्तु मिळतील याची व्यवस्था करणे. वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना या दृष्टिने सवलती देणे.

19) नियंत्रीत किंमतीमध्ये पुस्तके आणि स्टेशनरी यांची विक्री करणे.

20) दुर्बल घटकांकरीता निरनिराळया उद्योगधंद्यात आणी कारखान्यात शिकाऊ उमेदवारांच्या योजना लागू करणे.[1]

या 20 कलमी कार्यक्रमाला पंतप्रधान इंदिरा गांधींनी राष्ट्रीय महत्वाच्या अजुन पाच बाबी जोडल्या त्या पुढीलप्रमाणे होत्या–

1) नॅशनल फिटनेस

2) कुटूंब नियोजन

3) वनीकरणाच्या योजना

4) लहान मुलांच्या कल्याणकारी योजना

5) शहरी विकास

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासुनच वेगवेगळया सरकारच्या धोरणांव्दारे आर्थीक उन्नतीच्या धोरणांला प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु 20 कलमी योजनेच्या पुर्वीची धोरणे आपले उद्‌दीष्ट यशस्वीरीत्या गाठू शकले नाही. भारतीय जिवन खऱ्या अर्थाने भारताच्या गावांमध्ये दिसुन येते, म्हणून जोपर्यंत शासकीय धोरणात ग्रामीण जिवनाच्या विकासासाठी कार्यक्रम नसतील तोपर्यंत ती यशस्वी होवू शकत नाही. 20 कलमी योजनेव्दारे जो आर्थीक कार्यक्रम श्रीमती इंदिरा गांधींनी दिला त्यामध्ये प्रामुख्याने भारतातील ग्रामीण समाजाच्या सामाजीक व आर्थिक विकासाकडे लक्ष पुरविले गेले. श्रीमती इंदिरा गांधीनी हा कार्यक्रम घोषीत करतांना आपल्या प्रसारणात सांगीतले, –"हमारी जनता मे से अधिकांश देहाती क्षेत्रो में रहते है। हमे जोत की अधिकतम सीमा संबंधी कानुन को लागू करना बौर भुमिहीनो मे फालतु भुमि का वितरण दुगने उत्साह से करना चाहिए। भुमि संबंधी खातो को पुरा करने मे स्थानीय लोगों की सहायता की जरूरत है। इस बात का विशेष ध्यान रखा जाएगा कि जनजातीय लोगो को उनकी भुमि से वंचीत न किया जाए। देहाती क्षेत्रो मे मकानो के लिए स्थान की व्यवस्था करने के लिए कार्यक्रम का बहूत विस्तार किया जाएगा। उन भुमिहिन मजदुरों को स्वामित्व के अधिकार देने के लिए कानुन बनाऐ जायेंगे, जो कुछ निश्चित अवधि से अधिक समय तक अपने मालिकों की जमीन पर घर बनाकर रह रे है। उन्हे निकानले की कार्यवाही करने वालो को सख्ती से रोका जाएगा। बंधन मे फसे हूए मजदूरों से काम लेने की परंपरा घृणित है, उसे समाप्त किया जाएगा। इस प्रकार से काम लेने के लिए जो करार या अन्य प्रबंध किए गए है उन्हे गैरकानुनी घोषीत किया जाएगा। खेतिहर मजदुर हमारे समाज

का वह अंग है जिसका बुरी तरह से शोषण किया जाता है। खेती हर मजदुर के लिए न्युनतम वेतन संबंधी वर्तमान कानुन की भी समीक्षा की जाएगी और जहॉं आवश्यक होगा, न्युनतम वेतन को उचित रूप से बढाने के लिए कार्यवाही की जाएगी"।[2]

श्रीमती इंदिरा गांधींनी याप्रकारे ग्रामीण समाजाला मुख्य स्थान देवून समाजवादी अर्थव्यवस्थेची निर्मीती केली आहे. ग्रामीण भारताचा आर्थीक विकास ही काळाची हाक श्रीमती गांधींनी ओळखली. भारतासारख्या देशातील सर्वात मोठी समस्या ही कौशल्य विकास असुन मुख्यता विकासामध्ये आवश्यक संतुलन स्थापित केले जावे हा मानस यामागे होता. त्याचाच परिणाम 20 कलमी योजणेअंतर्गत शहरी जमीनीचे समाजीकरण करण्याकरीता देखील वैधानीक पाऊल उचण्याची व्यवस्था करण्यात आली.

20 सुत्री कार्यक्रमाच्या घोषणेद्वारा श्रीमती इंदिरा गांधींनी भारतीय जनतेला कर्तव्याविषयी जागरूक तसेच राजकीय भावनेला जागृत केले. त्यामुळे जनतेला असे वाटू लागले की राष्ट्रासाठी रचनात्मक कार्य करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. या कार्यक्रमांतर्गत व्यक्तिगत जबाबदारी व स्वयंनिर्मीती यावर विशेष लक्ष देण्यात आले. श्रीमती इंदिरा गांधीद्वारे सर्वप्रथम राज्यकर्त्यांना ताकीद देण्यात आली की त्यांनी लोक कल्याणाविषयी सदैव जागरूक आणि क्रियाशील रहावे. तसेच लोकशाहीमध्ये सरकारला अधिकार जनतेकडून याच आधारावर मिळतात की त्यांनी आपल्या अधिकाराचा वापर जनतेच्या हितासाठी, अधिकारांच्या संरक्षणासाठी आणि त्यांच्या इच्छेच्या पुर्ततेसाठी करावा.– ''श्रीमती इंदिरा गांधींनी 20 सुत्री कार्यक्रमांद्वारा भारत देशाला लोककल्याणकारी राष्ट्र बनविण्याच्या दिशेने अग्रेसीत केले. लोक कल्याणाचा अर्थ म्हणजे मनुष्याला त्या मुलभुत सुविधा उपलब्ध करून देणे ज्याद्वारे व्यक्ती आपला सामाजिक, आर्थिक, बौध्दिक आणि नैतिक विकास साध्य करू शकेल. या करीता सर्वप्रथम कल्याणकारी राज्याद्वारे व्यक्तिचा आर्थीक सुरक्षीततेची व्यवस्था केली पाहीजे. कारण राजकीय शक्ती ही आर्थीक शक्तीची सहगामीनी असते. ''[3] भारताला एक लोककल्याणकारी राष्ट्र बनविणे हेच भारतीय संविधानाचे देखिल उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टपुर्तीकरीताच श्रीमती गांधीनी सर्वप्रथम कमीत–कमी आर्थीक स्तर मिळविण्यासाठी प्रगतीशील पाऊले उचललीत. जर लोक कल्याणकारी राज्य निर्माण करावयाचे असेल तर काही नागरीकांना स्वतःच्या आर्थीक स्वातंत्र्याच्या काही मर्यादेपर्यंत त्याग करावा लागेल. श्रीमती इंदिरा गांधीनी आर्थीक स्वातंत्र्य काही प्रमाणात कमी करण्यासंदर्भात सांगीतले होते, " कर की चोरी अपराध है। इस प्रकार चोरी से बचाया हुआ काला धन आलीशान और आरामदायक मकान बनाने मे काम आता है। शहरी संपत्ती का बहूत ही कम मूल्य दिखाया जाता है। संपत्ती के मुल्यांकन के लिए विशेष दस्तो की स्थापना की जायेगी। कडा दंड दिया जायेगा। तस्करो के विरूध्द अभियान मे तेजी लाई जायेगी। तस्करो की संपत्ती चाहे उनके नाम मे हो या बेनामी हो जप्त कर ली जाएगी।"[15]

## * 20 सुत्री आर्थीक कार्यक्रम : एक जनकल्याणकारी पाऊल :–

श्रीमती इंदिरा गांधीनी भारतीय प्रजासत्ताक शासन व्यवस्थेला लोककल्याणकारी राज्याच्या आदर्शाकडे नेण्याकरीता एक सशक्त प्रयत्न 20 सुत्री आर्थीक कार्यक्रमाच्या घोषणेच्या रूपात केला. एका राजनेत्याच्या रूपात भारतामध्ये या गोष्टीचे श्रेय श्रीमती इंदिरा गांधीना मिळाले आहे. आपल्या धोरणांमध्ये लोकहीताला इंदिरा गांधींनी सर्वात जास्त महत्व दिले. लोकहीताचा संबंध राज्यशास्त्रीय भाषेत एखाद्या विशिष्ट व्यक्तिशी नसुन संपुर्ण समाजाशी असतो. एका व्यापक परिप्रेक्षामध्ये लोकहिताचा अर्थ सामाजीक आर्थीक व राजकीय दृष्टिणे व्यक्तिंच्या संधीच्या असमानतेला दुर करून साधारण व्यक्तिंच्या मुलभुत गरजांची पुर्तता करण्याची व्यवस्था करणे होय. आपल्या 20 सुत्री आर्थीक कार्यक्रमाच्या अंतर्गत सार्वजनीक हिताला मुळ आधार माणुन भारतामध्ये जिवीत आणि संपत्तीचे रक्षण, न्यायाची व्यवस्था व सामाजिक प्रगतीची आधारशिला ठेवण्याचे धाडस केले. श्रीमती इंदिरा गांधीनी 20 सुत्री कार्यक्रमाव्दारे भारतीय नागरीक निकृष्ठ जिवनातून बाहेर पडून चांगल्या जीवनात प्रवेश करू शकतील असा पुल तयार केला. राज्याचा संबंध त्याच्या नागरीकाला त्या मुलभुत सोयी उपलब्ध करून देणे आहे. ज्याव्दारे सामान्य नागरीक आपला सामाजीक, आर्थिक नैतिक व बौध्दीक विकास करू शकेल. अशाच आदर्श राज्याला लोककल्याणकारी राज्य असे म्हणतात. आर्थीक हित साधल्याशिवाय राजकीय हित प्राप्त करण्याचे काहीच महत्व ठरत नाही हे जाणुनच श्रीमती गांधींनी व्यक्तिच्या आर्थीक सुरक्षीततेची व्यवस्था करण्याकडे प्राधान्य दिले. राजकीय सत्तेला सामान्यांच्या हिताबरोबर टिकवून ठेवायचे असेल तर ते आर्थीकदृष्टया विकसीत असणे आवश्यक ठरते. अर्थव्यवस्थेच्या आदर्शांना स्पष्ट करतांना सांगीतले होते की, "हम सब यह विश्वास करते है की, अर्थव्यवस्था के महत्वपूर्ण अंग ऐसे लोंगो के हाथ में न हो जो थोडेसे लोगों के लाभ के लिए स्थिती से नाजायज फायदा उठायें, बल्कि सरकार के हाथ में हो ताकी वह साधनों का उपयोग राष्ट्रीय कार्यक्रमो के लिए कर सके। हमारा यही प्रयत्न रहा है।"[5]

भारतामध्ये सगळीकडे सावकार, मालक, जमीनदार हे उच्च जातीचे आहेत आणि बहूसंख्य भुमीहीन, मजुर हे छोटया जातीचे आहेत. सामाजीकदृष्ट्या जातिचे स्तरीकरण हे आर्थीक स्थितीला खुप प्रभावित करते. भारतामध्ये जातीने मागासलेले असण्याबरोबरच आर्थीकदृष्ट्या देखील मागासलेले असणे यांची परंपरा फार जुनी आहे. देशातील तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे महागाई आणि भ्रष्टाचार आपल्या चरम सिमेवर पोहचला होता. या परिस्थितीचा मुकाबला करण्याकरीता श्रीमती गांधीनी आणिबाणीची घोषणा केली. तसेच देशातील सामान्य नागरीकाला कल्याणकारी राज्याप्रमाणे त्याला जगतांना सामान्य सुख–सुविधांचा लाभ घेता यावा याकरीता 20 सुत्री कार्यक्रम लागु केला.

## ✱ संदर्भग्रंथ सुची :


1) डॉ.उषा तिवारी, 'इंदीरा गांधी और भारतीय राष्ट्रिय कॉंग्रेस', वर्धमान ऑफसेट प्रा. लि. प्रकाशन, इंदौर, प्रथम आवृत्ती, ऑक्टों. 1993 पृ.क्र.91–92

2) विरेंद्रकुमार तिवारी, 'इंदिरा गांधी का भारतीय राजनीती मे योगदान' डिप ॲन्ड डिप प्रकाशन, न्यु दिल्ली, प्रथम आवृत्ती 1983 पृ.क्र.239–240.

3) उपरोक्त, पृ. क्र.240

4) श्रीमती इंदिरा गांधींच्या राष्ट्रिय प्रसारणाचा अंश, दिनांक 1 जुलै 1975

5) इंदिरा गांधी, इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉंग्रेसच्या सभेमध्ये दिलेल्या भाषणाचा अंश, दिनांक 15 नोव्हेंबर 1975.